लोकमत


# क्रिकेटच्या हवेत ऑलिम्पिक

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यामुळे पुन्हा एकदा १९८३ च्या विश्वचषक विजयाच्या आठवणी ताज्या होणे स्वाभाविक आहे. कपिलदेवच्या संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर देशप्रेमाची एक मोठी लाट आली होती. त्याच धर्तीवर महिला विश्वचषक जिंकल्यानंतरसुद्धा देशप्रेमाच्या जोडीला क्रीडाप्रेमही उफाळले आहे. म्हणूनच, सध्याच्या २०३६ ऑलिम्पिकच्या आयोजनाची चर्चा जोर धरू लागली आहे.**



**अधिकृतपणे, भारताने** ऑलिम्पिक यजमानपदासाठी दावेदारी केली आहेच आणि त्याची पूर्वतयारी म्हणून २०३० सालच्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारीही स्वीकारली आहे. ऑलिम्पिकमध्ये जगातील २०० देश सहभागी होत असतात, तर राष्ट्रकुल स्पर्धेत ६० देश सहभागी होतात. यावरून, ऑलिम्पिक स्पर्धेच्या आयोजनाचे आव्हान किती प्रचंड असते, याची कल्पना आपण करू शकतो.

ऑस्ट्रेलिया, मलेशिया यासारख्या देशांनी राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनासाठी असमर्थता दर्शवली. त्यामागे, या स्पर्धेचे आर्थिक आव्हान हे एक प्रमुख कारण आहे. या पार्श्वभूमीवर ऑलिम्पिकच्या आयोजनाची जेव्हा आपण चर्चा करतो, तेव्हा ती किती व्यावहारिक आहे, याचा आढावा क्रीडा तज्ज्ञांच्या प्रतिक्रियेतून आपल्याला घेता येतो. क्रीडा अभ्यासक प्रशांत जोगळेकर यांच्या मते, भारतीयांमध्ये क्रीडा प्रेम वाढविण्यासाठी ऑलिम्पिकसारख्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन फार उपयोगी ठरू शकते. परंतु, त्यासाठी आवश्यक असलेल्या प्रचंड भांडवली खर्चाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. २०२० च्या टोकियो आणि २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकच्या आयोजनाचा खर्च हा त्या दोन्ही देशांसाठी अद्याप डोकेदुखीचा विषय बनला आहे. सध्या आपल्या देशाच्या क्रीडा संस्कृतीचा पाया अत्यंत निमुळता आहे. जोगळेकर यांच्या मते, देशातील बहुतेक युवा खेळाडू त्यांच्या वयाच्या १३ वर्षानंतर सक्रियपणे खेळापासून दूर जातात. त्यामुळे भारत हा देश भलामोठा प्रेक्षकांचा देश बनला आहे. अशावेळी, ऑलिम्पिकसारखा महोत्सवी उपक्रम केल्यामुळे नेमके काय साध्य होईल, याबाबत ते शंका व्यक्त करतात.

मैदान बचाव समितीचे भास्कर सावंत यांच्या मते, ऑलिम्पिक किंवा राष्ट्रकुल स्पर्धांचे आयोजन करणे, हे ऋण काढून सण साजरे करण्यासारखे आहे. अशा भपकेबाज समारंभाची खरेच गरज आहे का, असा सवाल करून ते म्हणतात की, जागतिक क्रीडा स्पर्धा भरवून क्रीडा संस्कृतीचा विकास होत नसतो. त्यासाठी तळागाळापर्यंत काम करण्याची गरज आहे. यामध्ये मैदानांची निगा राखणे, उदयोन्मुख खेळाडूंना नोकरी देणे, छोटी-छोटी क्रीडा संकुले उभी करणे, क्रीडाक्षेत्राचा पायाविस्तार करणे, यासारख्या दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे.

अर्थतज्ज्ञ संजीव चांदोरकर म्हणाले की, "देशाच्या उभारणीसाठी आणि निकोप समाजासाठी क्रीडा क्षेत्राचे महत्त्व मोठे आहे. खेळांमुळे समाजातील प्रत्येकाला स्वत्वाची ओळख होत असते. हे जरी खरे असले, तरी ऑलिम्पिकसारख्या महागड्या उत्सवाची गरज कोणत्या टप्प्यावर आहे, याची खात्री करून घेतली पाहिजे. तसेच, ऑलिम्पिक संपल्यानंतर सर्व क्रीडा संकुले सामान्यांसाठी सहजपणे उपलब्ध करून दिल्यास, हा भांडवली खर्च अनाठायी ठरणार नाही. वरिष्ठ क्रीडा पत्रकार पौलमी कुंडू यांच्या मते ऑलिम्पिक आयोजनामुळे देशातील क्रीडा संस्कृतीला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल हे नक्की. पण, त्याची किंमत काय मोजावी लागेल, याचा आधी अभ्यास करणे योग्य राहील. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाचे वार्षिक बजेट अंदाजे ३ हजार ५०० कोटी रुपयांचे असते आणि ऑलिम्पिक आयोजनाचा खर्च ३० हजार ते ६० हजार कोटी रुपयांच्या घरात जाऊ शकतो. ऑलिम्पिक आयोजनाला प्रचंड मोठ्या आर्थिक तरतुदीची गरज आहेच, जोडीला आंतरराष्ट्रीय राजकीय डिप्लोमासीचीसुद्धा तितकीच गरज असणार आहे. पाकिस्तानसारखे शेजारी राष्ट्र भारतात रंगणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये सहभागी होऊ शकेल का, हासुद्धा कळीचा मुद्दा ठरू शकतो.